


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २४२ ●सोमवार,दि.०१ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# सत्ताधाऱ्यांनी कितीही सभा घेतल्या तरी, बीडचा मतदार आमच्या सोबत : आ. संदीप क्षीरसागर

## तुतारी आणि मशालचे वातावरण बनले



**बीड । प्रतिनिधी**

सत्ताधाऱ्यांनी कितीही सभा घेतल्या तरी, बीडचा सामान्य मतदार आमच्या सोबत आहे. त्यामुळे विजय निश्चित असल्याचा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ प्रभाग १४, ४, २३, २४ मध्ये रविवारी (दि.३०) रोजी झालेल्या कॉर्नर सभांमध्ये ते बोलत होते. दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना ठाकरे पक्ष आघाडीनेच, आघाडी घेतल्याने शहरात तुतारी व मशालचे वातावरण निर्माण झाले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे,समाजवादी पार्टी आघाडीच्या बीड नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या व प्रभाग १४ नगरसेवक पदाच्या उमेदवार कल्याणी अशोक राजपुरे, धम्मप्रिया रवी वाघमारे यांच्या प्रचारार्थ पंचशील नगर, प्रभाग ०४ भारत भास्कर कांबळे, मंगलाबाई संजय चांदणे यांच्या प्रचारार्थ काळा हनुमान ठाणा परिसर, पेठ बीड येथे सभा तर प्रभाग २३ आणि २४ मध्ये खुर्शीदमिया मोमीन शाहमोहम्मद, शेख बानुबेगम महेमूद , जोया अनम मोहम्मद मेसीयुद्दीन, शेख अफसर शेख महंमद यांच्या प्रचारार्थ मोमीनपुरा भागात आ. संदीप क्षीरसागर यांनी कॉर्नर सभा घेतली. यावेळी बोलताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले की, बीडमध्ये सभा घेण्याची स्पर्धा लागलेली आहे. पण सत्ताधाऱ्यांनी कितीही सभा घेतल्या तरी, बीडचा सामान्य मतदार आमच्यासोबत असल्याचा आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. येत्या २ डिसेंबर रोजी तुतारी आणि मशाल चिन्हा समोरील बटन दाबून आमच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन केले. यावेळी माजी आ. सय्यद ▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहराच्या सर्वांगिन विकासासाठी सदसदविवेकबुद्धीने मतदान करा: ना. अजितदादा पवार

## अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत डॉक्टर, वकिल, शिक्षक प्राध्यापकांचा सुसंवाद मेळावा



**गेवराई । प्रतिनिधी**

बीड शहरातील परिस्थिती वेगळी आहे, इथे कामे न करताही परस्पर बीले उचलली जातात, मग विकास कसा होणार ? या बाबत बीड शहरातील सुशिक्षीत नागरीकांनी व डॉक्टर, वकिल, शिक्षक प्राध्यापकांनी शहराच्या विकासासाठी जागरूक असले पाहिजे. बीड शहरात एवढी दुर्गंधी या शहरात तुम्ही कसे राहता हा मला प्रश्न पडतो, बीडला चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्याची गरज आहे ते मी एका वर्षात चांगले अधिकारी आणून बीडचे प्रशासन सुधारण्याचा प्रयत्न करेल. मला ज्या-ज्या गोष्टी जाणवल्या त्या मी पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. रस्ते, नाल्या, प्रशासकीय इमारती व रखडलेल्या बीडच्या रेल्वेचा प्रश्न मार्गी लावला क्रीडांगणासाठी २५ कोटी रुपये दिले, शासकीय दवाखान्यासाठी आराखडा तयार करायला सांगितले आहे, कचरा व्यवस्थापन, पिण्याचे पाणी ▶ उर्वरित पान २ वर

# बाळराजे पवारांचा संजयनगर भागात डोअर टू डोअर झंझावात



## मतदारांच्या अभूतपूर्व साथीने सौ.गीताभाभीसह सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भाजपने सुरुवातीपासून जोरदार आघाडी घेतली असताना आज शेवटच्या टप्प्यात भाजप नेते बाळराजे पवार यांनी शहरातील राजकीय वातावरण अक्षरशः ढवळून काढले आहे. आज सकाळी त्यांनी संजय नगर भागात घेतलेल्या डोअर टू डोअर प्रचार फेरीने सौ.गीताभाभी व सर्वच प्रभागातील उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आहे.

भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे (त्रिंबक) पवार यांच्या प्रचारात बाळराजे पवार यांनी संपूर्ण शहरातील प्रभागांसाठी आखलेले काटेकोर नियोजन आणि उमेदवारी प्रक्रियेत दाखवलेली अचूकता आता त्याचे परिणाम दाखवत आहे. गेल्या आठ दिवसांपासून त्यांनी घेतलेल्या सलग बैठकांमध्ये कार्यकर्त्यांना संघटित करून प्रत्येक प्रभागासाठी सर्वाधिक जनमत मिळवल्याचे दिसत आहे. बाळराजे पवारांनी आज संजय नगरात घराघरांत जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या असता नागरिकांनी त्यांचे केलेले स्वागत, महिलांचा उत्साह, युवकांची उपस्थिती यामुळे भाजपची लाट स्पष्ट जाणवत आहे. या दरम्यान बाळराजे यांनी मतदारांना आवाहन केले की, भाजपच्या ▶ उर्वरित पान २ वर

# धक्कादायक! बीडमध्ये बनावट आधार काढल्याची तक्रार, निवडणूक अधिकाऱ्यांनी काढलं पत्र

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यभरात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीच वार आहे. दोन दिवसांवर मतदान आलं आहे. असं सगळ असतानाच आता बीड येथून मोठी बातमी समोर आली आहे. येथे मोठ्या प्रमाणात बनावट आधार कार्ड काढल्याचं समोर आलं आहे. असे बनावट आधार कार्ड काढून मतदान वाढवल जात किंवा त्यामध्ये गोंधळ केला जातो हे लक्षात घेऊन आता निवडणूक अधिकारी कविता ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमधील प्रभाग ३ (ब) चे आक्षेप असल्याने २० तारखेला मतदान!

**● राजकारण तापले, निवडणूक आयोगाने मागविला अहवाल**



**बीड । प्रतिनिधी**

नगरपरीषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमर नाईकवाडे आणि अमृत सारडा प्रभाग ३ ब मधून नगरसेवक पदासाठी अटीतटीच्या सामना होत असून, या जागेवर नाईकवाडे यांचा आक्षेप असल्याने याचा अहवाल निवडणूक आयोगाने अहवाल मागविला असल्याने येथील २ तारखेचे मतदान रद्द होऊन २० डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. यामुळे येथे राजकारण तापले असल्याचे दिसून येत आहे. तर प्रभाग ३ ब जागेसाठी २० ▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडे समर्थक नावाने फेसबुकवर फेक अकाऊंट काढून अजितदादांची बदनामी करण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीच्या धामधुमीत धनंजय मुंडे समर्थक या नावाने फेसबुकवर खोटे फेक अकाउंट काढून त्यावरून राज्याचे उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांची बदनामी करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्याची धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाकडून तात्काळ दखल घेण्यात आली असून सदर फेक अकाउंट विरोधात धनंजय मुंडे यांच्या वतीने अक्षय तिडके यांच्यामार्फत बीड सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. धनंजय मुंडे समर्थक असल्याचे नाव वापरून अशाप्रकारे ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमधील ४५ मतदान केंद्रे संवेदनशील, कडेकोट पोलीस बंदोबस्त

**बीड । प्रतिनिधी**

आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिका क्षेत्रांमध्ये एकूण ४५ मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. विधानसभा निवडणुकीत देखील बीडमधील काही मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले होते. यानंतर आता नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या उद्देशाने पोलीस प्रशासनाने पाहणी करून या केंद्रांची माहिती घेतली आहे. बीड जिल्हा पोलिस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सर्वाधिक संवेदनशील मतदान केंद्रे अंबाजोगाई नगरपालिका क्षेत्रात




असून त्यांची संख्या १७ आहे. त्या खालोखाल माजलगावमध्ये ११ आणि परळीतही ११ मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित झाली आहेत. बीड शहर पालिकेसाठी सहा केंद्रे संवेदनशील आहेत. विशेष म्हणजे, धारूर आणि गेवराई नगरपालिका क्षेत्रांमध्ये शांततापूर्ण वातावरणामुळे एकही मतदान केंद्र संवेदनशील नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या सर्व ४५ संवेदनशील केंद्रांवर निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, प्रशासनाने याची संपूर्ण तयारी केली आहे. जिल्ह्यात ४३४ मतदान केंद्रे आहेत. यात बीड १७९, परळी ८८, अंबाजोगाई ६९, माजलगाव ४५, गेवराई ३१ आणि ▶ उर्वरित पान २ वर




# शुभम धूत यांनी आपल्या वार्डात विकास गंगा आणतील प्रचंड बहुमताने विजयी करा माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक २ मधून आम्हाला कायमच मतांची आघाडी मिळाली आहे. त्यामुळे या प्रभागावर विशेष लक्ष देऊन विकासकामे करण्यात आली आहेत. पूर्वी येथे केवळ अरुंद रस्ता होता. तो रुंद करून मोठा व दर्जेदार रस्ता तयार करण्यात आला. पूर्वीचा आणि आजचा रस्ता यातील फरक नागरिकांच्या लक्षात येतो. बीडकरांची आजपर्यंत जशी साथ मिळाली, तसेच यापुढेही मिळणार, याची मनात तीळमात्र शंका नाही, असा विश्वास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

शहरातील नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे, प्रभाग क्रमांक २ मधील भाजपचे उमेदवार शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे यांच्या प्रचारार्थ जयदत्त क्षीरसागर यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिनकरराव कदम, सखाराम मस्के, माजी नगरसेवक ▶ उर्वरित पान २ वर

## अण्णा, अध्यक्षसाहेबांच्या माध्यमातून विकास-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड शहरात सर्वाधिक आघाडी देणारा प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक २ असल्याचे सांगत डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत या प्रभागाने आम्हाला भरभरून पाठबळ दिले आहे. येथे जवळपास सर्वच विकासकामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे आगामी काळात पूर्ण केली जातील. या भागात मोठे सिमेंट रस्ते झाले आहेत. माळी समाजाचे दैवत असलेल्या संत सावता महाराज मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न झाले. जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून भव्य सभागृह उभारण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गोरगरिबांची सामाजिक कार्ये येथे पार पडणार आहेत. या प्रभागातील काम करणाऱ्या लोकांनाच प्राधान्य देण्यात आले असून शुभम धूत, सावित्री नितीन साखरे आणि नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.



# अडथळ्यावर मात करू, एकजुटीने HIV/AIDS ला लढा देऊ आणि नव परिवर्तन घडवू

बीड जिल्हा हा प्रामुख्याने कायम ऊस तोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख असलेला यामुळे साहजिकच मोठ्या प्रमाणात लोक ऊस तोडणी साठी इतर जिल्हात जातात पण पाहिजे ती आरोग्याची काळजी घेत नाहीत तसे पाहता आपण संगणकीय यूगात जगत आहोत,समाजान विज्ञानाच्या रूपाने खूप मोठी क्रांती केली आहे. तसेच समाजात वेगवेगळ्या प्रसार माध्यमांच्या माध्यमातून जनजाग्रती रॅली, पोस्टर प्रदर्शन,कलापथक कार्यक्रम, आरोग्य शिबिरे,बचत गट मेळावे, जनजाग्रती मेळावे तसेच जाहिराती इत्यादि प्रसार माध्यमानी समाज HIV/AIDS माहिती संदर्भात पिंजून काढला असला तरीही HIV/AIDS शब्द उच्चारताच व्यक्तीच्या चेहेऱ्यावरील हाव-भावमध्ये मोठ्या प्रमाणात बदल दिसून येतो. कारण समाज जाग्रती झाली असली तरी देखील मन जाग्रती त्याप्रमाणात झाली नाही, म्हणून एचआयव्ही सह जीवन जगणाऱ्या व्यक्ती बरोबर आजही समाजात मोठे गैरसमज आहेत. यामुळे त्यांना कलंक व भेदभावाची वागणूक मिळते आहे.

HIV होण्याचे मुख्य चार कारणे जरी असले तरीदेखील समाजाने स्वतः तयार केलेले अनेक गैरसमज जनजागृती होऊन देखील दूर होत नाहीत,किंवा आपण ती दूर होऊच देत नाहीत आणि हेच खरे कारण आहे. HIV सह जगणारा माणूस त्या आजारपेक्षाही समाजाने दिलेल्या वागणुकीमुळे (कलंक व भेदभावने) लवकर खचतो त्याची जगण्याची उमेद कमी होते. यासाठी समाज जाग्रती बरोबर मन जाग्रती, आपले पनाची भावना, प्रेमाची भावना, समाज परिवर्तनची भावना, कलंक व भेदभाव मिटवण्याची भावना ही खऱ्या अर्थाने HIV सह जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनमान उचावण्यासाठी उचललेले पहिले पाउल आसेल. या लोकांना चांगले जीवन जगण्याची उमेद निर्माण केली तरच हा प्रकल्प खऱ्या आर्थणे यशस्वी झाला व हा जागतिक एड्स दिन साजरा करण्यामागचा हेतु सार्थ झाला असे आपणाला म्हणता येईल.

आज समजामध्ये तुम्ही HIV तपासणीचे महत्व जाणून आजच तपासणी करा असा संदेश जागतिक एड्स दिनाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. जिल्हामध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियत्रन संस्था मुंबई यांच्या सहकार्याने ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड यासारख्या संस्थेच्या माध्यमातून HIV/AIDS जनजाग्रती तपासणी मार्गदर्शना बरोबर बेटी बचाव,झाडे लावा झाडे जगवा, ग्राम स्वछ्यता आरोग्य शिबीर यामध्यमातून जिल्हाभर वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात. तसेच जिल्हा एड्स प्रतिबंध व नियत्रन विभाग बीड व दोन्ही ART CENTER, सर्व ICTC center च्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर HIV,STI,TB तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन ग्रामीण विकास मंडल बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड तर्फे केले जात आहे.

वरील कार्यक्रमाच्या माध्यमातून आज समाजातील HIV च्या वाढत्या प्रमाणाला बऱ्यापैकी आळा बसला आहे कलंक व भेदभावाचे प्रमाणं कमी होताना दिसत आहे. तसेच HIV सह जीवन जाणाऱ्या व्यक्तिला चांगले जीवन जगण्यासाठी चांगली दिशा नवीन उमेद या जन जगर्ती शिबिराच्या माध्यमातून मिळताना दिसते. याचे सर्व क्षेय महाराष्ट्र राज्य एड्स नियत्रन संस्था मुंबई व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियत्रन विभाग बीड च्या अंतर्गत ART Center/ ICTC Center बीड ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड यांना जाते.

अशाच प्रकारचे कार्य ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड या संस्थेच्या माध्यमातून जिल्हाभर चालू आहे, व ते यापुढे देखील समाज जनजग्रर्ती व समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अखंडपणे कार्य असेच चालूच राहील. यामुळे येणारी पिढी ही नक्कीच निरोगी व सुदृढ आसेल त्यामुळे देशाच्या विकासाला नक्कीच मोठा हातभार लागेल.

1) ENDING THE HIV EPIDEMIC.
2) शून्य गाठायचे आहे.
3) तुम्ही HIV तपासणीचे महत्व जाणून घेतले आहे का?
4) KNOW YOUR STATUS.
5) "असमानता संपवा ,एड्स संपवा" आणि जगण्याला बळ द्या.
6) मोफत HIV तपासणी माहिती टोल फ्री नं-1097.

या कार्यक्रमासाठी नेहमीत मार्गदर्शक म्हणून मा.डॉ. संजयजी राऊत साहेब ( जिल्हा शल्य चिकित्सक बीड) मा.सुहासजी कुलकर्णी साहेब ( जिल्हा कार्यक्रमधिकारी बीड) मा. सय्यद सय्यद बाबामिया (अद्यक्ष ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड) सहकार्य मिळाले आहे.



**- मा. वाघमारे रामेश्वर हरिश्चंद्र**
**जिल्हा साधन व्यक्ती बीड जिल्हा**
**(7588042363)**
**ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा**
**अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड.**

◆ पान १ वरून पुढे...

## सत्ताधाऱ्यांनी कितीही...

सलीम, माजी आ.संगिता ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चे प्रदेशाध्यक्ष तसेच आंबेडकरवादी चळवळीतील प्रमुख चेहरा अजिंक्य चांदणे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे व नगरसेवक पदाचे उमेदवार आणि मतदार हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## बीड शहराच्या...

आदी समस्या सोडविण्यासाठी कृती आराखडा तयार करून तेही प्रश्न निकाली काढणार. बीड शहराच्या सर्वांगिन विकासासाठी शहरातील सुशिक्षित लोकांनी विकासासाठी सहकार्याची भुमिका घेऊन बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत सद्सद् विवेक बुध्दीने मतदान करा व बीडचा सर्वांगिन विकास आपण सर्व मिळून करूया ! दर महिन्याला मी पालकमंत्री म्हणून या सर्व विकास कामांवर लक्ष ठेऊन ती मार्गी लावू. बीडमध्ये सुडाचे राजकारण चालू असते हे चांगले नाही, जोपर्यंत मला तुमची साथ आहे तोपर्यंत चांगले व प्रामाणिक काम करत राहणार उद्याच्या निवडणुकीत माझ्या विचाराची नगर परिषद आली तर मी शहराचा सर्वांगिन विकास करेल प्रशासकीय अधिकाऱ्यांना माझा धाक आहे हे सांगण्याची गरज नाही. आपल्याला सर्व समाजाचे भले करायचे आहे त्यासाठी आपण सामुहिकपणे काम करू व बीड शहरातील आरोग्य, शिक्षण, रोजगार व सुविधा यांसारखे अनेक प्रश्न मार्गी लावू त्यासाठी उद्याच्या बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाच्या नगराध्यक्षासह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांन निवडून द्या मी बीडचा विकास करूनच दाखवेन असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी केले.बीड नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना- शिवसंग्राम-सपा मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील ग्रँड यशोदा हॉटेल येथे बीड शहरातील डॉक्टर, वकिल, व्यापारी, शिक्षक, प्राध्यापक यांच्या सुसंवाद मेळाव्यात बोलत होते. याप्रसंगी आ. विजयसिंह पंडित यांनी या सुसंवाद मेळाव्याचे प्रास्ताविक करताना सांगितले की, बीड शहराच्या विकासासाठी शहरातील उच्च शिक्षित लोकांच्या मार्गदर्शनाची गरज असते म्हणूनच या सुसंवाद मेळाव्याचे आयोजन केले होते.

◆ पान १ वरून पुढे...

याप्रसंगी शिवसंग्रामच्या नेत्या डॉ.ज्योतीताई मेटे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिलदादा जगताप, डॉक्टर सेलचे डॉ.अनंत मुळे, डॉ.गिते, ड.बाळासाहेब कोल्हे, ड.मनिषा खुपकर, सी.ए.भानुदास जाधव व गोरक्ष लोखंडे यांची उपस्थिती होती. ड.मनिषा खुपकर, डॉ.अनंत मुळे, सी.ए.भानुदास जाधव, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष निलेश ललवाणी इत्यादींनी आपआपल्या क्षेत्रातील समस्या मांडल्या. बीड शहरात प्रथमच उच्चशिक्षित नागरीकांशी सुसंवाद मेळाव्याचे आयोजन केल्याने बीड शहरातील डॉक्टर, वकिल, व्यापारी, शिक्षक, प्राध्यापक प्रचंड संख्येने उपस्थिती होती. थेट पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याबरोबर सुसंवाद साधता आला याबद्दल या सर्वांच्या चेहऱ्यावर सकारात्मक भाव दिसून आला.

## बाळराजे पवारांचा...

नगराध्यक्षांसह सर्व प्रभागातील उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून गेवराईचा विकासरथ थांबू देऊ नका. गेवराईला विकासाचा मार्ग भाजपच दाखवू शकते. बाळराजे पवारांच्या या झंझावाती प्रचारामुळे राष्ट्रवादीच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर दिसणारी लोकांची गर्दी, प्रत्येक प्रभागातून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद, भाजप उमेदवारांच्या बाजूने वाढती हवा हे सर्व पाहता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढलेली दिसत आहे. बाळराजे पवारांचा प्रचार दौरा शहरभर झंझावात निर्माण करत आसल्याने गेवराईत भाजपचा विजय अटळ आसल्याचे चित्र दिसत आहे संजयनगर प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार ज्ञानेश्वर भाले, सज्जु बागवान, व प्रभाग ४ चे माऊली वांदे,अन्वर पठाण यांच्या प्रचारार्थ भेटीगाठी घेऊन भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.गिताभाभी पवार व सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन लोकनेते बाळराजे पवार यांनी मतदारांना केले यावेळी वार्डातील नागरिक पदाधिकारी उपस्थित होते

## धक्कादायक! बीडमध्ये...

जाधव यांनी एक पत्र काढलं आहे. बीडमधील बाहेरगावी वास्तव्य करणाऱ्यांच्या नावे बनावट आधार कार्ड तयार करण्यात येत आसल्याचे निर्दशनास आल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल. सर्वे आधार केंद्र, सेतु केंद्र आणि इतर तत्सम काम करणारे सेंटर यांना प्राप्त तक्रारीनंतर सुचना देण्यात येत आहे की, जर अशा पद्धतीने कुणी बनावट आधार कार्ड

◆ पान १ वरून पुढे...

बनवल्याचं आढळ्यास मालकासह सहकाही ऑपरेटरवरी गुन्हा दाखल करण्यात येईल. त्याचबरबोर बनावट आधार कार्ड असणारे मतदानाच्या दिवशी आढळल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील. मतदारांनी मतदान करण्यासाठी येताना फक्त आधार कार्ड घेऊन न येता मतदान कार्ड, ड्राविंग लायसन पासपोर्ट फोटो असेले बँक पासबुक यापैकी एक सोबत घेऊन यावे. तसंच, मतदान केंद्रावर च--रवहरी ॲप मार्फत बारकोडची पडताळणी करण्यात येईल याची सर्व मतदारांनी नोंद घ्यावी असं पत्र निवडणूक अधिकारी कविता जाधव यांनी काढलं आहे.

## बीडमधील प्रभाग ...

डिसेंबरला मतदान होईल आणि इतर नगराध्यक्ष आणि अ ची निवडणूक वेळेवर होईल. नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार शिगेला पोहोचला असून मतदानासाठी केवळ एक दिवस मध्ये आहे. प्रभाग क्रमांक ३ ब मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाकडून अमर नाईकवाडे आणि भाजपाकडून अमृत सारडा असा अटीतटीचा सामना आहे. या प्रभागाकडे पूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. तर येथे अमर नाईकवाडे यांनी विरोधी उमेदवारावर अपील दाखल आहे. यामुळे येथे सुरुवातीपासून राजकीय वातावरण तापले आहे. यामध्ये निवडणूक आयोग आणि न्यायालयाने अमृत सारडा यांचा अर्ज वैध ठरविला आहे. पुन्हा या प्रभागाचा अहवाल मागवून घेतल्याने दोन तारखेचे मतदान रद्द होण्याची टांगती तलवार कायम आहे. जर २ तारखेचे मतदान रद्द झाले तर यासाठी २० डिसेंबर रोजी मतदान होण्याची शक्यता आहे. परंतु प्रभाग ३ अ आणि नगराध्यक्षपदाची निवडणूक वेळेवरच होणार आहे. यामुळे प्रभाग ३ ब चे राजकीय वातावरण तापले असून, यामुळे आता काय होणार याकडे बीडकरांचे लक्ष लागले आहे.

## धनंजय मुंडे समर्थक...

अजितदादांच्या बदनामीकारक पोस्ट करणे आक्षेपार्ह असून संभ्रम देखील निर्माण करणारे आहे. त्यामुळे सदर तक्रारीची गंभीर दखल घेत तातडीने गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, अशा सूचना सायबर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे यांना धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आली आहे. तर सदर प्रकरणात तातडीने माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक श्री. निलेश केळे यांनी सांगितले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## बीडमधील ४५...

धारूरमधील २२ मतदान केंद्रांचा समावेश आहे. दरम्यान, नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतलाय. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील प्रमुख शहरांमधील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जारी केले आहेत. बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी आणि अंबाजोगाई या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदानाच्या दिवशी आठवडी बाजारामुळे होणारी गर्दी, वाहतूक कोंडी आणि त्यातून निर्माण होणारे अडथळे टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य (पुणे) यांनी देखील या दिवशी बाजार बंद ठेवण्यास किंवा पुढे ढकलण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार द मार्केट अँड फेअर ॲक्ट १८६२ च्या कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. प्रशासनाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी आणि अंबाजोगाई येथे भरणारे आठवडी बाजार २ डिसेंबरला पूर्णपणे बंद राहतील.

## शुभम धूत...

भारत यादव, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, अजय सवाई, संगीताताई धसे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मीनाताई अरुण कांबळे व विष्णू यादव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचे स्वागत करण्यात आले. बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात आणण्यासाठी सर्वांनी जोमाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही करण्यात आले. जयदत्त क्षीरसागर म्हणाले, या प्रभागातील जनता आमच्यासाठी जिवाभावाची आहे. इथून आम्हाला नेहमीच मोठे मताधिक्य मिळते. मतदारांनी आपल्या मर्जीतील, जनतेची सेवा करणाऱ्या उमेदवारांना निवडून द्यावे. या प्रभागात मोठे बाजारपेठ विकसित झाली असून आजची परिस्थिती पाहिली तर विकास झाल्याचे स्पष्ट दिसते. मूलभूत सुविधा या नगरपालिकेशी निगडित असल्याने त्या सक्षम लोकांच्या हाती देणे गरजेचे आहे. राज्यात जनहिताचे सरकार असल्याने खालपासून वरपर्यंत एकाच विचाराची सत्ता असावी. विकासकामांना अडथळा आणणाऱ्यांना घरी बसवा आणि 'कमळ' समोरील बटन दाबून तिन्ही उमेदवारांना भरघोस मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## देवाभाऊ व पंकजाताईंच्या...

विकासासाठी आलेला निधी कुठे गेला? व त्याचे काय झाले? याच्या खोलात न जाता मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब व पर्यावरण मंत्री. मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या कुशल नेतृत्वाखाली आम्ही शहराचा कायापालट करण्यासाठी काय करू शकतो? आमच्या संकल्पना काय आहेत? यावर चर्चा करणे उचित होईल. आरोप – प्रत्यारोप व एकमेकांचा खालच्या पातळीवर जाऊन उद्धार करणे ज्याचे त्याला लखलाभ असल्याचेही डॉ.शेटे म्हणाले. एकंदरीत डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या रॅली व सभांनी प्रचारात रंगत आणली आहे. सर्वच वार्डात भाजपमय परिस्थिती निर्माण झाल्यामुळे भाजपचा एकतर्फी विजय होईल अशी मतदारांमध्ये उघड बोलले जात आहे. सर्व कार्यकर्ते एक दिलाने कामाला लागले असल्यामुळे नगरपालिकेवर नक्कीच भाजपाचा झेंडा फडकला जाईल यात शंका नाही.

## भ्रष्ट आणि विकास...

करणाऱ्या उमेदवारांनाच मत द्यावे. गुंडगिरी करणाऱ्या उमेदवारांना आणि पुढाऱ्यांना रोखण्याची ही एक संधी असते. गुंडगिरीला जात नसते. त्यामुळे मतदाराने समर्थपणाने मतदान केले पाहिजे. ज्या ठिकाणी बोगस मतदान होत आहे, त्या ठिकाणी मतदारांनी उभे राहून बोगसगिरी थांबवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांना आज पर्यंतच्या काळामध्ये ज्या ज्या वेळी तुमच्याकडे सत्ता होती, त्या त्यावेळी काय विकास केला. शहरातील गल्ली बोळांमध्ये किती चिखल होतो, रस्ते किती खराब आहेत, वीस दिवसाला पाणी का येते ? हे सगळे प्रश्न विचारायला पाहिजेत. मतदारांनी प्रश्न विचारले नाही, तर लोकशाही संपत असते. त्यामुळे मतदारांनी पुढाऱ्यांना देखील असे प्रश्न विचारले पाहिजेत, असेही ड. देशमुख यांनी म्हटले असून जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

## मनोज शिंदे....

जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी व्हिजेएनटीसेना, एसटी कामगार सेनेचे आजी- माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धनंजय मुंडेंना...

मदतीची आठवण करून दिली आणि अत्यंत सुस्थितीत असलेल्या सुरेशला पाहून धनंजय मुंडे यांना सुखद धक्काच बसला! त्यानंतर धनंजय मुंडे यांनी सुरेशची आस्थेवाईकपणे चौकशी केली. याबद्दल धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्ट शेअर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सुरेश वर अतिशय गंभीर शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली त्यावेळी दैवयोगाने आपल्या नाथ प्रतिष्ठान मार्फत सुरेशची शस्त्रक्रिया करून दिली आणि त्याचे प्राण वाचले. आज १४ वर्षांचा सुरेश त्याच्या वडिलांसह भेटला आणि केलेल्या मदतीची आठवण करून दिली; कधी एकेकाळी केलेली

◆ पान ४ वरून पुढे...

छोटीशी मदत आशीर्वाद बनवून पाठीशी उभी राहते, यापेक्षा मोठे भाग्य आणि आनंद दुसरा कोणता? अशा शब्दात मुंडेंनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तर सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाली असून धनंजय मुंडे यांनी याप्रकारे अनेकांना आजवर मदत केल्याचे लोक सांगत आहेत. काही दिवसांपूर्वीच आष्टी तालुक्यातील पाटसरा गावातील आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सनी फुलमाळी याने आंतरराष्ट्रीय बीच कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यानंतर त्याच्या आईने देखील सनी फुलमाळी याचा पाय मोडल्यानंतर त्याच्या लिगामेंटच्या शस्त्रक्रियेसाठी धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठान मार्फत आर्थिक मदत केली व त्यामुळेच तो आंतरराष्ट्रीय कुस्ती खेळू शकला, अशा शब्दात मुंडेंनी केलेल्या मदतीबद्दल आभार मानले होते.

## गेवराईकरांचा पक्का ...

निवडणुकीमध्ये तगडी फाईट होणार असून प्रामुख्याने सौ.गीताभाभी बाळराजे पवार व सौ. शितलताई महेश दाभाडे यांच्यात चुरशीची लढत होणार आहे. महेश दाभाडे यांच्या चांगल्या कामाची व दांडग्या जनसंपर्काची तसेच मा.आ.अमरसिंह पंडित यांचे मार्गदर्शन व आमदार विजयसिंह पंडित यांनी विकास कामाची दाखवलेली झलक याची शितलताईंना चांगली मदत होणार असून यावेळेस गेवराईकरांनी पक्का निर्धार केला आहे की, शितलताईच्याच झोळीत आपला मतदान रुपी आशीर्वाद द्यायचा व शितलताई बरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना निवडून द्यायचे असे आवाहन युवा नेत्या सौ.सिमा होंडे यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत असताना केले.

## सर्व समाजाला....

पायाभूत सुविधा आणि सामाजिक योजनांना प्राधान्य देत शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी ओळख दिली आहे. त्यांच्या विकासकेंद्री कार्यप्रणालीवर बीडकरांचा दृढ विश्वास आहे. डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात बीडमधील पायाभूत सुविधा, आरोग्य उपक्रम, नागरिकसेवा आणि रस्ते-सुधारणा या क्षेत्रांना नव्याने वेग मिळत आहे. बीड शहराच्या प्रगतीसाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय असून, विकासाच्या दिशा व कार्यपद्धतीत त्यांनी सातत्यपूर्ण सक्रिय भूमिका निभावली आहे. या विकासयात्रेला अधिक बळ देण्यासाठी, भाजपा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योतीताई घुंबरे तसेच सर्व भाजपा नगरसेवक उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन गणेश लांडे यांनी केले आहे.

## सुभाष सुतार...

असल्याची चर्चा होऊ लागली आहे. गेवराई शहरातील अनुभवी, पदवीप्राप्त आणि सत्यनिष्ठ पत्रकार म्हणून सुभाष सुतार यांचा लौकिक दीर्घकाळापासून कायम आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, नागरी व विकासकामांवर त्यांनी नेहमीच निर्भीडपणे आवाज उठवत जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवला. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची दखल घेऊनच भाजप नेते बाळराजे पवार यांनी प्रभाग क्रमांक ८ मधून त्यांच्या कन्या कु. सोनाली सुतार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. पत्रकार समाजाचा प्रतिनिधी सभागृहात जावा आणि विकासाच्या प्रश्नांवर

◆ पान ४ वरून पुढे...

प्रभावीपणे आवाज उठावा, यासाठी दिलेली ही उमेदवारी विशेष महत्त्वाची मानली जात आहे. या प्रभागातून रेकॉर्डब्रेक मताधिक्याने त्यांचा विजय निश्चित असून, त्यांच्या नेतृत्वामुळे प्रभाग ८ चा चेहरामोहरा बदलणार आहे. लोकसेवेचा वारसा, प्रामाणिक भूमिकांचा ठसा आणि जनतेचा अपार विश्वास या तीन स्तंभांवर उभ्या असलेल्या सुभाष सुतार यांच्या मुलीच्या उमेदवारीला मिळणारा प्रतिसाद पाहता, प्रभाग ८ मध्ये विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून, भाजपाचे अधिकृत उमेदवार सोनाली सुभाष सुतार आणि शहदाद भाईंचा विजय निश्चित असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

## पवारांनी सुरु...

गरज आहे. त्यांच्या अशा मग्रुरी मुळेच लोकांनी त्यांचे डिपॉझिट जप्त केले. स्वतः च्या कर्मांनी झालेला पराभव पवारांना पचवता आला नाही. त्यामुळे ते आमच्या उमेदवारांना व मतदारांना धमक्या देऊ लागले आहेत. हे त्यांच्या पराभवाचे लक्षण आहे. याउलट अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित हे झालेला पराभव स्वीकारुन दिलदार मनाने लोकांचे कामे करत राहीले. म्हणूनच लोकांनी विद्यमान माजी आमदाराचे डिपॉजीत जप्त करुन विजयसिंह पंडित यांना भरघोस मतांनी निवडून दिले. म्हणून तर मागील ११ महिन्यात कोट्यवधी रुपयांचे विकास कामे होऊ शकली आहेत. अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांनी सुरू केलेला हा विकास यज्ञ अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी घड्याळाला मतदान करून नगर परिषद मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता द्या. असे आवाहन त्यांनी केले. पवारांना स्वतःवर व स्वतः च्या कामावर विश्वास राहीला नसल्याने त्यांनी आमच्या घरामध्ये महाभारत सुरू केले आहे. परंतु ते विसरले आहेत कि, या युद्धामध्ये माझे सारथ्य हे बाप माणूस मा.आ. अमरसिंह पंडित हे करत आहेत. शिवछत्र परिवार माझ्यासोबत आहे. शिवछत्र परिवारातील आ. विजयसिंह पंडित हे मित्र आहेत तर पृथ्वीराज पंडित व रणवीर पंडित सारखे युवक सोबत आहेत. शिवछत्र परिवाराचे संस्कार, विकासाचा दृष्टिकोन व व्हिजन असल्याने गेवराई करांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळाला मतदान करून नगराध्यक्षा व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून द्या. असे आवाहन त्यांनी केले.

## नवनाथ शिराळे...

जिल्ह्यात लागली आहे याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी निवडणुका जाहीर झाल्यापासून घराघरांमध्ये जाऊन भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणीच्या दरम्यान देखील त्यांनी भारतीय जनता पार्टीचे सर्व समाज हिताचे कार्य काय आहे हे देवा भाऊ कशाप्रकारे महाराष्ट्र राज्यामध्ये काम करत आहेत तसेच मोदी साहेब देखील भारत देशामध्ये कशाप्रकारे लोकांचा विकास होईल यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत या सर्व महत्त्वाच्या बाबी या मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे जेष्ठ नेते अतिशय अनुभवी असलेले यांनी महानगरपालिकेच्या नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच भाजपचे कार्य सर्व बीड जिल्ह्यातील जनतेला व बीड शहरातील नागरिकांना समजून सांगितलेले आहे आणि आता निवडणुका जाहीर झाल्यानंतर प्रचाराला सुरुवात झाली की मा नवनाथ शिरोळे पाटील यांनी बीड शहरांमध्ये

◆ पान ४ वरून पुढे...

प्रत्येक वार्डमध्ये जाऊन भाजपाची सत्ता आणण्यासाठी बीड पिंजून काढले आहे व नगरपालिकेवर झेंडा भारतीय जनता पार्टीचाच फडकवण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत आणि त्यांच्या प्रयत्नाला यश देखील येत आहे बीड शहरातील गल्ली गल्ली मध्ये नवनाथ अण्णांच्या नावाची चर्चा सध्या सुरू आहे वार्ड क्रमांक ११ १२ १६ १७ १८ यामध्ये त्यांनी प्रभात फेरी त्यांनी काढली आहे तसेच सर्व वार्डमधील उभा असलेले भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांना व नगर अध्यक्षपदाच्या उमेदवाराला भारतीय जनता पार्टीच्या निवडून देण्यासाठी सर्व बीड शहरातील नागरिकांना कळकळीचे अण्णांनी आवाहन केले आहे व भारतीय जनता पार्टीचे कार्य हे अतिशय उत्कृष्ट आहे देव देश व धर्म यासाठी सातत्याने लोकांना मदत करणारा हा भारतीय जनता पार्टीचा एकमेव पक्ष आहे या भारतीय जनता पार्टीच्या उत्कृष्ट मुख्यमंत्री देवा भाऊ महाराष्ट्र मध्ये करत असलेल्या व मोदी साहेब भारतामध्ये करत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी वार्ड क्रमांक २५ मध्ये मोठी महासभा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी घेतली आहे या महासभेच्या दरम्यान शेकडो नागरिक उपस्थित होते नागरिकांना त्यांनी आवाहन केले आहे की बीड नगर परिषदेवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा आपल्याला फडकवायचा आहे आणि एक हाती सत्ता आपल्याला बीड नगर परिषदेवर आणायची आहे त्यामुळेच ही महाप्रचार सभा वार्ड क्रमांक २५ मध्ये आयोजित केले आहे जेणेकरून या भारत देशांमध्ये मोदी साहेबांचे सत्ता आहे महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊची सत्ता आहे तसेच प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रत्येक नगरपरिषदेवर ग्रामपंचायतीवर देखील भाजपची सत्ता असावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आपल्याला नगरपरिषदेवर भारतीय जनता पार्टीचाच अध्यक्ष नगराध्यक्ष म्हणून बसवून त्यांच्याकडून बीड शहराचा सर्वांगीण विकास करून घ्यायचा आहे तसेच विकासाची महागंगा बीड शहराला देण्यासाठी देवा भाऊ हे समर्थ कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री आपल्याला लाभल्यामुळे आपल्याला आता काळजी करायची गरज नाही म्हणून लाडक्या बहिणींच्या साठी देखील आता लखोपती बहीण कशी करता येईल यासाठी देखील नगरपालिकेच्या माध्यमातून मा मुख्यमंत्री महोदय प्रयत्न करत आहेत म्हणून बीड शहरातील नागरिकांनी कुठलीच विकासाच्या बाबतीत काळजी करायची गरज नाही बीड शहराचा सर्वांगीण विकास काय असतो ते आपण येणाऱ्या भविष्य काळामध्ये दाखवून देऊ असे देखील भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते नवनाथ शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे आणि लोकांना देखील अतिशय उत्सुकता आहे की भारतीय जनता पार्टीचे सरकार हेच आपल्याला भविष्य काळामध्ये येणाऱ्या न्याय देऊ शकते अशी भावना देखील आता बीड शहरातील तमाम मतदार बंधू आणि भगिनी तसेच लाडक्या बहिणीमध्ये निर्माण झाली आहे म्हणून आता भारतीय जनता पार्टीचाच झेंडा बीड नगर परिषदेवर मोठ्या धुमधडाक्यात फडकणार असल्याचे सध्या नागरिकांमधून बोलले जात आहे कारण भाजपाचे जेष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे अनुभवी व्यक्ती आहेत त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे बीड नगर परिषदेचे सभापती असताना कार्य केलेले आहे मग आता देखील नगराध्यक्ष भारतीय जनता पार्टीचे झाल्यानंतर या नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्याकडून अनेक बीड शहरातील लोकांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत आणि त्या नक्कीच ते पूर्ण करतील असा विश्वास देखील बीड शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नगर परिषद पुन्हा ताब्यात द्या, विकासाच्या कुठल्याच कामात कधी कमी पडणार नाही : धनंजय मुंडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहराच्या प्रत्येक गल्लीबोळाचा सर्वांगीण विकास करण्याचा, तिथे रस्ते, नाली, वीज, पाणी यासह विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्याचबरोबर शहराच्या सर्वांगीण विकासाचा अजेंडा घेऊन आम्ही पुन्हा एकदा नगर परिषद निवडणुकीस सामोरे जात आहोत. ऑटो रिक्षा जाऊ शकत नाही अशा गल्लीमध्ये सुद्धा सिमेंट रस्ते केले आहेत, काही कामे बाकी आहेत तीही येत्या



वर्षभरात पूर्ण करू. पुन्हा एकदा नगर परिषदेमध्ये प्रचंड मतांनी विजयी करा इथल्या विकासाला कधीही कमी पडणार नाही असा शब्द धनंजय मुंडे यांनी मलिकपुरा भागातील कॉर्नर सभेत बोलताना स्थानिक नागरिकांना दिला आहे. परळी नगर परिषदेत

## ● मलिकपुरा, वडार कॉलनी, माणिकनगर भागातील नागरिकांशी मुंडेंनी साधला संवाद
## ● शादीखाना आणि उद्यानाचे काम सहा महिन्यात सुरू करू – मुंडेंचा शब्द

निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सोबत सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह प्रभाग क्र. १७ मधील उमेदवार सौ. रुपाली रमेश पवार आणि शेख हाजी बाबू यांच्या प्रचारार्थ शहरातील मलिकपुरा, वडार कॉलनी, माणिक नगर व परिसरातील नागरिकांशी कॉर्नर बैठकीच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी मलिकपुरा भागात ५० लाख रुपये खर्चून शादी खाना उभारण्याचे काम सहा महिन्याच्या आत सुरू केले जाईल तसेच तेथील ओपन स्पेस मध्ये उद्यान निर्मितीचे काम देखील सहा महिन्यांच्या आत सुरू केली जाईल असा शब्द धनंजय मुंडे यांनी दिला. काही दिवसांमध्ये काही संबंध नसताना काही ठराविक लोकांनी माझी व माझ्या आडून परळी शहराची राज्यात बदनामी केली, या नगर परिषद निवडणुकीत परळीचे लोक भक्कमपणे धनंजय मुंडे आणि पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभे आहेत, ते मतांच्या रुपाने दाखवून द्या, असे आवाहनही श्री. मुंडे यांनी पुढे बोलताना केले.

मला कितीही टार्गेट करा परंतु इथल्या मातीला व माणसाला त्रास देऊ नका, बदनाम करू नका, ते आम्ही सहन करणार नाही, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी निक्षून सांगितले. दरम्यान आगामी काळात अनेक मोठ्या प्रकल्पांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर देखील भर दिला जाईल, असेही धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी व्यासपीठावर बाजीराव भैय्या धर्माधिकारी, डॉ. संतोष मुंडे, तुळशीराम पवार, सुरेशअण्णा टाक, प्रा.विनोद जगतकर, दत्ताभाऊ सावंत, एजाज शेख, वहाब भाई, जावेद भाई, एशतीयाक भाई, नाझर भाई, अमित केंद्रे, अन्सार भाई, याहीया शेख, मतीन शेख, रमेश पवार, अशोक पवार यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन : अभ्यागतांसाठी सूचना व भित्तिपत्रकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी तयार करण्यात आलेल्या सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते रविवारी (दि. ३०) राजभवन, मुंबई येथे करण्यात आले. यावेळी बोलताना राज्यपालांनी डॉ आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ज्येष्ठ आर्य समाजी नेते आत्माराम अमृतसरी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला



पाठविण्यास मदत व शिफारस केली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समरसता व बंधुभाव या मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी आपण विविध तालुक्यांना भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. आजपर्यंत आपण गुजरात येथील ११ गावांना भेट दिली असून त्याठिकाणी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामसभा, दलित – आदिवासी कुटुंबाच्या घरी भोजन, शाळेत मुक्काम व दुसऱ्या दिवशी शिवारावर जाऊन लोकांना नैसर्गिक शेतीचे महत्व पटवणे हा उपक्रम सुरु केला असल्याचे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात देखील हा उपक्रम सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच समितीचे इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

# बाळासाहेब गुंजाळ आणि पायल जाधव यांच्या विजयासाठी जनतेनेच जोर लावला

## ● प्रभाग क्र. २१ मध्ये घड्याळीचाच गजर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक २१ ब मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार बाळासाहेब गुंजाळ आणि प्रभाग क्र. २१ अ मधील पायल दत्ता जाधव या दोन्ही उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. गुंजाळ आणि जाधव या दोघांची घडी प्रभागात सर्वत्र जोरात गजर करू लागली आहे. बीड



शहरातील प्रभाग क्रमांक २१ ब मधील उमेदवार बाळासाहेब गुंजाळ यांनी या भागात मोठ्या प्रमाणावर कामे केलेली आहेत. कसलेही प्रकारचा स्वार्थ न पाहता लोकांच्या आणि अडचणीसाठी धावून जाणारा युवा नेता म्हणून बाळासाहेब गुंजाळ यांची ओळख आहे. त्यामुळेच प्रभात सर्वत्र सर्वसामान्य जनतेने त्यांची निवडणूक हाती घेत प्रचाराचा जोर लावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सभेमुळे बाळासाहेब गुंजाळ आणि पायल जाधव यांना मोठे बळ मिळाले आहे. अजितदादांनी ज्याप्रमाणे बीड शहराच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेत विकासाचे मुद्दे भाषणात मांडले.त्याच पद्धतीने बाळासाहेब गुंजाळ आणि पायल जाधव यांनी प्रभाग क्रमांक २१ च्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून परिसराचा कायापालट करण्याचा निर्धार केलेला आहे. प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याबरोबरच प्रभागाच्या वैभवात भर टाकेल अशा पद्धतीची विकास कामे करण्याचा संकल्प गुंजाळ यांनी केला आहे.

# प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी स्व – संरक्षण प्रशिक्षणास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**धुळे । प्रतिनिधी**

विद्यार्थिनींना संकट समयी स्व– संरक्षण करता यावे म्हणून जिल्हा प्रशासनाने वीरांगना प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेतला. या प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी स्व – संरक्षण प्रशिक्षणास विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर गुरुवारपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय वीरांगना प्रशिक्षणास मुख्य प्रशिक्षक शिफूजी शौर्य भारद्वाज जवळपास दहा हजारांवर विद्यार्थिनींना प्रशिक्षण देत आहेत.



दुसऱ्या दिवसीय प्रशिक्षण सत्रास जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अधीक्षक अभियंता अनिल पवार, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय बागडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील (प्रशासन), उप जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, राज्य उत्पादन शुल्काच्या अधीक्षक स्वामी काकडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर (धुळे), तहसीलदार साहेबराव सोनवणे, अरुण शेवाळे, अपर तहसीलदार वैशाली हिंगे आदी उपस्थित होते.

# सोन्याचे दर पुन्हा उच्चांक गाठणार ?

**मुंबई । प्रतिनिधी**

सोन्याच्या दरात पुन्हा एकदा ऐतिहासिक तेजी पाहायला मिळत आहे. सोन्याच्या दरात काही दिवस घसरण झाल्यानंतर पुन्हा तेजी सुरु झाली आहे. आता सोने नवा उच्चांक गाठेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

दैनिक मराठवाडा पत्र दि. ३०/११/२०२५

**कागदपत्रे हरवले हरवले आहेत.**

विकास गिन्यादेव राठोड या नावाचे इयत्ता १२ वी चे कागदपत्रे पुणे ते वडवणी प्रवासात हरवले आहेत.
सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
संपर्क : ९०७५७६७६७७

# जागतिक एड्स दिन : आजही जिवंत राहिलेली एक मोठी लढाई

**● दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जगभरात ‘ जागतिक एड्स दिन ’ म्हणून साजरा केला जातो. एच आय व्ही – एड्स विरुद्ध लढा , जागरूकता , प्रतिबंध आणि उपचार या सर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो . मागील चार दशकांत या रोगाने लाखो जीव घेतले , कोट्यवधी कुटुंबे उद्ध्वस्त केली आणि समाजाच्या आरोग्य व्यवस्थेला मोठे आव्हान निर्माण केले . एड्स हा केवळ वैद्यकीय प्रश्न नसून सामाजिक , मानसिक आणि आर्थिक पातळीवर परिणाम करणारा जटिल प्रश्न आहे . वैज्ञानिक प्रगती , औषधे , जागरूकता मोहिमा या सर्वांमुळे एच आय व्ही आज पूर्णपणे बरा न होणारा असला तरी नियंत्रित ठेवता येणारा आजार झाला आहे . तरीसुद्धा जगभरात दरवर्षी लाखो नवीन रुग्ण आढळतात . यामुळे एड्स दिन आजही तितकाच महत्त्वाचा आहे .**

## ● एड्स चा इतिहास : रोगाचा उगम आणि जगावरचा प्रभाव :

१९८१ मध्ये अमेरिकेत पहिल्यांदा ‘ अज्ञात प्रकारचा रोग ’ म्हणून या आजाराची नोंद झाली . ती एक सुरुवात होती – पुढे संपूर्ण जगाला हादरवणाऱ्या आरोग्य संकटाची . सुरुवातीला वैज्ञानिकांना समजत नव्हते की हा रोग कसा पसरतो , कोणत्या कारणामुळे होतो आणि का अचानक तरुण लोकसंख्येत वाढतो आहे . पुढील संशोधनात कळले की हा रोग ‘ एच आय व्ही ’ नावाच्या विषाणूमुळे होतो जो शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवर (इम्युनिटी) हल्ला करतो . या विषाणूमुळे शरीरातील ‘ टी – सेल ’ किंवा ‘ सी डी ४ सेल ’ नष्ट होतात आणि शरीर कोणत्याही साध्या संक्रमणाविरुद्धही असहाय्य बनते . १९८० ते १९९० च्या दशकात या रोगामुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला . त्या काळात औषधांची कमतरता , भीती , चुकीची माहिती , सामाजिक कलंक – हे सर्व मिळून एड्स एक ‘ मृत्युचा हुकूम ’ ठरत होता . पुढे औषधांमध्ये ‘ ए आर टी ’ म्हणजे अँटी – रेट्रो व्हायरल थेरपी येताच परिस्थिती बदलू लागली . आज एच आय व्ही बधित व्यक्ती दीर्घकाळ सामान्य आयुष्य जगू शकते . पण अद्यापही जगभरात एड्समुळे दरवर्षी ६ लाखांहून अधिक लोक मृत्यूमुखी पडतात .

## ● एच आय व्ही कसा पसरतो ? :

एच आय व्ही चा प्रसार तीन प्रमुख मार्गांनी होतो –

१. असुरक्षित लैंगिक संबंध
२. संक्रमित सुई किंवा रक्ताद्वारे
३. संक्रमित आईपासून बाळाकडे

हे महत्वाचे आहे की एच आय व्ही स्पर्श , हसणे , हात मिळवणे , एकत्र बसणे , भांडी वापरणे , पाणी पिणे , कीटक चावणे यांद्वारे पसरत नाही . पण या गोष्टींबद्दल अजूनही अनेकांना चुकीची माहिती असते , त्यामुळे एड्स दिन हा गैरसमज दूर करण्यासाठी अत्यंत आवश्यक दिवस ठरतो .

## ● जगातील सध्याची स्थिती

जागतिक आरोग्य संघटनेनुसार आज जगभरात सुमारे ३ कोटी ९० लाख लोक एच आय व्ही सोबत जगत आहेत . दरवर्षी १५–१६ लाख नवीन बाधितांची नोंद होते . आफ्रिका खंडात सर्वाधिक बाधितांची संख्या आहे . आर्थिकदृष्ट्या गरीब देशांमध्ये औषधांची अनुपलब्धता , जागरूकतेचा अभाव आणि सामाजिक कलंक यामुळे एड्सचे प्रमाण जास्त आहे . काही देशांनी मात्र मोठी प्रगती केली आहे – रुवांडा , जपान , ऑस्ट्रेलिया , थायलंड , क्यूबा , युनायटेड किंग्डम – या देशांनी एच आय व्ही नियंत्रणात मोठे यश मिळवले आहे , कारण त्यांनी प्रतिबंधावर (प्रिव्हेन्शन) भर दिला , शिक्षण दिले आणि सर्वांसाठी औषध उपलब्ध केली .

## ● भारताची स्थिती

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे आणि आरोग्याच्या दृष्टीने आव्हानेदेखील मोठी आहेत . भारतीय सरकारच्या अहवालानुसार देशात तब्बल २६ ते २८ लाख लोक एच आय व्ही बाधित आहेत . महाराष्ट्र , तामिळनाडू , तेलंगणा , कर्नाटक आणि ईशान्येकडील काही राज्यांमध्ये बाधितांचे प्रमाण जास्त दिसते . भारतात २००० च्या दशकात एड्सचे प्रमाण जलद वाढत होते . परंतु एन ए सी ओ (नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन) ने सक्रिय मोहीम राबवल्यानंतर परिस्थिती नियंत्रित झाली . आज औषधे मोफत उपलब्ध आहेत , रक्त तपासणी सर्वत्र केली जाते , ‘ ९५ – ९५ – ९५ ’ हे उद्दिष्ट ठेवले गेले आहे – म्हणजे ९५ % लोकांना तपासणी , ९५ % बाधितांना औषधोपचार आणि ९५ % लोकांमध्ये विषाणूचे प्रमाण कमी करणे . भारतात अनेक स्वयंसेवी संस्था , महिला स्वयंसेवी गट , युवक संस्था , आरोग्य कर्मचारी आणि समाजसेवक यांचे मोठे योगदान आहे .

## ● महाराष्ट्रातील परिस्थिती

महाराष्ट्र हा एच आय व्ही – एड्सच्या संदर्भात उच्च – प्रचलनाचा राज्य म्हणून ओळखला जातो . मुंबई , पुणे , नागपूर , नाशिक , औरंगाबाद , कोल्हापूर या शहरांत तपासणी केंद्रे , उपचार केंद्रे आणि जनजागृती उपक्रम अधिक प्रमाणात चालतात . जिल्हा रुग्णालयांमध्ये ‘ आय सी टी सी ’ (इंटिग्रेटेड काउन्सेलिंग अँड टेस्टिंग सेंटर) उपलब्ध आहेत . युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी महाविद्यालयांतही कार्यक्रम घेतले जातात . रक्तबँकांमधील तपासणी प्रणाली खूप सुधारली आहे , ज्यामुळे संक्रमित रक्ताचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे .

## ● एच आय व्ही बधित व्यक्तींची मानसिक लढाई

वैद्यकीय उपचारांपेक्षा अधिक कठीण लढाई म्हणजे सामाजिक आणि मानसिक लढाई . एच आय व्ही बद्दल अजूनही समाजात गैरसमज आहेत – हा रोग चुकीचे जीवन जगणाऱ्यांना होतो , हा संसर्गजन्य आहे , एच आय व्ही म्हणजे मृत्यू – असे चुकीचे समज




अजूनही अनेकांना आहेत . या गैरसमजांमुळे रुग्णांवर मानसिक दबाव वाढतो , एकाकीपणा येतो , काम मिळत नाही , नातेसंबंध बिघडतात . त्यामुळे मानसिक सक्षमता वाढवणे , काउन्सेलिंग , आधारगट , कुटुंबाचे सहकार्य – ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे . आज अनेक शहरांत ‘ सपोर्ट ग्रुप ’ तयार झाले आहेत जे रुग्णांना मानसिक आधार देतात .

## ● उपचार

ए आर टी म्हणजे जीवनाची नवीन दिशा : पूर्वी एच आय व्ही म्हणजे मृत्यू असा समज होता . पण ए आर टी औषधांच्या आगमनानंतर परिस्थिती क्रांतिकारक बदलली . ए आर टी म्हणजे अँटी – रेट्रो व्हायरल थेरपी जी विषाणूची वाढ रोखते आणि शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती टिकवून ठेवते . हे औषध आयुष्यभर घ्यावे लागते , परंतु नियमित औषध घेणाऱ्या व्यक्तीचे आयुष्य सामान्य व्यक्तीइतकेच निरोगी राहू शकते . अनेक वेळा ‘ व्हायरल लोड ’ इतका कमी होतो की रुग्ण दुसऱ्याला विषाणू प्रसारितही करत नाही – याला ‘ अनडिटेक्टेबल ’ स्थिती म्हणतात . भारतात ए आर टी औषधे मोफत उपलब्ध असून ते मोठे यश आहे .

## ● एड्सबाबतच्या भीती आणि गैरसमज तोडण्याची गरज

एड्स दिनाचा मुख्य हेतूच गैरसमज दूर करणे हा आहे . एच आय व्ही स्पर्शाने , मिठीने , खाण्याने , भांडी वापरल्याने , एकत्र बसल्याने , पाण्याने कधीच पसरत नाही . हे सांगणे , समजावणे , शिक्षित करणे – हीच सर्वात मोठी गरज आहे . कारण गैरसमज संपले की भीती संपते आणि भीती संपली की उपचाराकडे वाटचाल वाढते .

## ● जागतिक स्तरावरचा संदेश

दरवर्षी जागतिक एड्स दिनासाठी एक थीम जाहीर होते . ती थीम साधारणपणे दोन गोष्टींवर आधारित असते – १) प्रतिबंध २) समानता आणि अधिकार . एड्सविरुद्धची लढाई जिंकण्यासाठी समाजातील प्रत्येकाला समान हक्क , आरोग्य सुविधा , शिक्षण आणि जागरूकता मिळणे अत्यावश्यक आहे .

## ● तरुण पिढी आणि एड्स जागरूकता

आज १५–२४ वयोगटातील युवकांमध्ये जागरूकता सर्वाधिक गरजेची आहे . इंटरनेट , सोशल मीडिया , बदलणारी जीवनशैली , चुकीची माहिती – या सर्वांमुळे तरुणांना योग्य माहिती पोहोचणे आवश्यक आहे . शाळा , महाविद्यालये , युवक केंद्रे , एन जी ओ , हेल्थ क्लब – यांच्यामार्फत आज एड्स विषयी माहिती दिली जाते .

## ● समाजातील कलंक – लढाईतील मोठी अडचण

एच आय व्ही रुग्णांना समाजात स्वीकारणे हे अजूनही आव्हान आहे . विवाह , नाते , नोकरी , शेजारी – अनेक ठिकाणी रुग्णांना भेदभावाला सामोरे जावे लागते . अनेकांना सांगायला भीती वाटते की ते एच आय व्ही पॉझिटिव्ह आहेत . या भीतीचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे रुग्ण तपासणी करायलाच येत नाहीत किंवा औषधे घेणं टाळतात . समाजातील कलंक कमी करणे अत्यंत गरजेचे आहे .

## ● सरकारची भूमिका

भारत सरकारचा एन ए सी ओ कार्यक्रम हा जगातील सर्वात मोठ्या एच आय व्ही कार्यक्रमांपैकी एक आहे . मोफत औषधे , मोफत तपासणी , जनजागृती मोहिमा , प्रवासी समुदाय , रेड लाईट क्षेत्र , ट्रक ड्रायव्हर , कारागृह – अशा सर्व धोक्याच्या गटांना विशेष सेवा पुरवल्या जातात . राज्य सरकारेदेखील जिल्हा पातळीवर अनेक कार्यक्रम राबवतात .

## ● भविष्यातील आव्हाने

एच आय व्ही बरा करणारा पूर्ण उपचार अद्याप उपलब्ध नाही . काही संशोधन सुरू आहे – जीन एडिटिंग , इम्युनोथेरपी , व्हॅकसिन – पण अजून ते प्रारंभिक टप्प्यात आहे . सर्वात मोठे आव्हान म्हणजे जागरूकता , औषधांचा नियमित वापर , तपासणी वाढवणे आणि समाजातील कलंक कमी करणे .

## ● मानवतेची अजूनही सुरू असलेली लढाई

जागतिक एड्स दिन हा केवळ एक दिवस नाही ; तो मानवतेसाठी चाललेली लढाई आठवून देणारा दिवस आहे . एच आय व्ही चा धोका अजूनही संपलेला नाही . आजही लाखो लोक या विषाणूसोबत जगतात , संघर्ष करतात , उपचार घेतात . या दिवसाचा संदेश एकच –

जागरूकता , स्वीकार आणि जबाबदारी – हेच एड्स विरुद्धचे खरे शस्त्र . मानवतेने दिलेल्या सर्वात मोठ्या अध्यायांपैकी एक म्हणजे एड्स विरुद्धची लढाई – आणि ही लढाई आपण जिंकू शकतो , जर माहिती , विज्ञान आणि करुणा या तिन्हींचा योग्य उपयोग केला तर .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**







दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०१ डिसेंबर २०२५ ● पान ४


## भ्रष्ट आणि विकास खुंटवणाऱ्या लबाड उमेदवारांना मत देऊ नका; मतदारांनो, मतदान करा– ॲड. अजित देशमुख



**बीड । प्रतिनिधी**

स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना पारदर्शकतेने, निर्भयपणे आणि जागरूकपणे मतदान करण्याचे आवाहन केले आहे. समाजात विकासाची वाट रोखणाऱ्या भ्रष्ट, गुंड, लबाड आणि जनतेची फसवणूक करणाऱ्या उमेदवारांना मतदानातून धडा शिकवणे, हीच खरी लोकशाहीची ताकद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशमुख म्हणाले की, मत हे केवळ बटण दाबणे नाही, तर आपल्या परिसराच्या भवितव्याचा निर्णय आहे. पैशांची देवाणघेवाण, जातीधर्माचे प्रलोभन आणि खोट्या आश्वासनांचे जाळे पसरवणाऱ्या उमेदवारांना ठामपणे नकार देणे, ही प्रत्येक सजग मतदाराची जबाबदारी आहे. त्यांनी पुढे सांगितले की, स्वच्छ आणि जबाबदार नेतृत्व निवडले, तरच शहराचा विकास शक्य आहे. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही दबावाखाली बळी न पडता, योग्य आणि सचोटीनं काम▶▶ उर्वरित पान २ वर

# देवाभाऊ व पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली माजलगाव शहराचा कायापालट करणार

## डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी भाजपच्या प्रचाराची मोट आवळली

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपालिका निवडणुकीत डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी भाजपाच्या प्रचाराची मोट आवळली असून मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. केंद्रात व राज्यात आपले सरकार आहे, त्यामुळे शहराच्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव शहराचा



कायापालट करणार असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले.

माजलगाव शहरातील प्रत्येक वार्डात डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी झंजावाती दौरा केला. गल्लीबोळात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा केल्या. तसेच सामान्य लोकांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती असलेल्या डॉ.शेटे यांनी नागरिकांना शहराच्या सर्वांगीण विकासाचा शब्द दिला. तसेच शहराच्या प्रगतीसाठी आपल्याकडे असलेल्या विविध संकल्पना त्यांनी मांडल्या. माजलगाव ला मराठवाड्यातील सर्वात सुंदर शहर बनवण्याचा आपला मनोदय असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. शहरात अनेक ठिकाणी झालेल्या डॉ. शेटे यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचा अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रात फिरत असलो तरी 'माजलगावचा भूमिपुत्र' हीच माझी ओळख आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. मात्र राज्यातील इतर शहराकडे पाहिल्यावर विकासाच्या बाबतीत आम्ही किती मागे आहोत हे लक्षात येते. आजपर्यंत शहराच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# मनोज शिंदे, अशोक पटवर्धन यांच्या उपस्थितीत शिवसेनेची भव्य प्रचार रॅली संपन्न; जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसंग्राम युतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा– अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसंग्राम युतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. काल दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या भव्य प्रचार रॅलीच्या माध्यमातून बीड शहरात जोरदार उत्साह आणि ढोल–ताशांच्या गजरात शक्तीप्रदर्शन करण्यात आले. या रॅलीला शिवसेना पक्षाचे बीड नगर पालिका निरीक्षक मनोज शिंदे साहेब, मराठवाडा विभागीय



सचिव पटवर्धन साहेब, तसेच बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांची प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे आणि प्रभाग क्र. १ मधील अजय जाधव आणि मीनाताई नवनाथ शिंदे, प्रभाग क्र. २ मधील सत्यजित गुरकुदे, प्रभाग क्र. ५ मधील सुरज चुंगडे आणि वैशाली पांडे, तसेच प्रभाग क्र. २६ मधील शीतलताई चक्रे आणि संजय उडान यांच्या प्रचारार्थ स्वतंत्र रॅल्या काढण्यात आल्या. रॅलीदरम्यान युतीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मतदारांच्या डोर–टू–डोर भेटी घेत, आगामी विकास आराखड्याची माहिती दिली. नागरिकांना बीड शहराचा कायापालट करण्यासाठी धनुष्यबाण आणि घड्याळ या चिन्हांसमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. उत्साह, घोषणाबाजी आणि मोठ्या प्रमाणावर झालेल्या जनसहभागामुळे बीडमधील निवडणूक वातावरण अधिक तापले आहे. याप्रसंगी शिवसेना ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंना 'तो' भेटला अन् 12 वर्षांपूर्वी केलेल्या मदतीची काढली आठवण!

## कधी काळी केलेली मदत आशीर्वाद बनून पाठीशी उभी राहते यापेक्षा मोठे भाग्य अन् आनंद कोणता? मुंडेंची भावनिक पोस्ट व्हायरल

**परळी वै. । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी बारा वर्षांपूर्वी एका लहान मुलाच्या हृदयावरील शस्त्रक्रियेला मदत केल्याची आठवण तब्बल १२ वर्षांच्या नंतर मूर्त स्वरूपात भेटल्याने एक वेगळाच सुखद धक्का बसल्याचे समोर आले आहे.

घडले असे की परळी शहरातील गणेशपार भागात राहणाऱ्या चि. सुरेश शंकरराव मस्के हा दोन वर्षांचा असताना म्हणजेच बारा वर्षांपूर्वी त्याच्या हृदयाला गंभीर आजार झाला होता. घरची परिस्थिती अतिशय सामान्य असल्याने



त्याचे वडील शंकरराव यांनी त्यावेळी धनंजय मुंडे यांना मदत मागितली. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी त्यांच्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात सुरेशच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्याचा ते अगदी ये जा करण्यापर्यंत संपूर्ण खर्च केला आणि सुरेशचे प्राण वाचले. हाच सुरेश आता चौदा वर्षांचा झाला असून काल सायंकाळी प्रचारादरम्यान आपल्या वडिलांसह अचानक धनंजय मुंडे यांना भेटला. यावेळी त्याच्या वडिलांनी बारा वर्षांपूर्वी केलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईकरांचा पक्का निर्धार, सौ.शितल ताईंच्याच झोळीत मताचा आशिर्वाद: सौ.सिमा होंडे

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषदची निवडणूक चुरशीची होत आहे. नगराध्यक्ष पदाच्या भाजपच्या उमेदवार सौ. गिताभाभी बाळराजे पवार यांच्या समोर राष्ट्रवादी कॉग्रस पार्टीच्या सौ. शितलताई महेश दाभाडे यांनी तगडे आव्हान उभे केले आहे. सदरील निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर होत असून अल्पशा दिवसातच आ.विजयसिंह पंडित यांनी विकास कामांची दाखवलेली झलक पाहता गेवराईकरांनी यावेळेस पक्का निर्धार केला असून,



शितलताईच्याच झोळीत टाकणार मताचा आशीर्वाद असे वक्तव्य युवा नेत्या सौ.सिमा होंडे यांनी मतदारांच्या गाठीभेटी वेळेस केले. महेश दाभाडे हे समाजसेवेत नेहमीच अग्रेसर असतात त्यांच्याकडे अडीअडचणी घेऊन जाणारा कधीच निराश होत नाही. ते नेहमी चांगला सल्ला देतात कोणालाही ते सहज उपलब्ध होतात सर्व गुण संपन्न असे त्यांचे व्यक्तिमत्व असून गेवराई शहरासह तालुक्यात त्यांना मानणारा एक मोठा वर्ग आहे. तरुणांचा मोठा फौज फाटा त्यांच्यासोबत आहे. मा.आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांची महेश दाभाडे यांना साथ असून त्यांच्या पाठीशी खंबीर उभे आहेत तसेच यावेळेस नगरपरिषद ▶▶ उर्वरित पान २ वर

## सर्व समाजाला न्याय देणारा एकमेव पक्ष म्हणजे भाजपा; कमळ चिन्हाला मतदान करून प्रचंड बहुमताने विजयी करा - गणेश लांडे, जिल्हा सरचिटणीस

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा हा सर्व समाजाला न्याय देणारा आणि सर्वांना विकासाच्या प्रवाहात समान संधी देणारा पक्ष असल्याचे मत भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी



व्यक्त केले आहे. आगामी बीड नगर परिषद निवडणूक माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपा जिल्हा अध्यक्ष शंकररावजी देशमुख साहेब भाजपा वरिष्ठ नेते सर्जेराव तात्या तांदळे, भाजपा शहराध्यक्ष अशोकजी लोढा, नवनाथ अण्णा शीराळे,आणि विशेषतः डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात होत असल्याचे त्यांनी सांगितले. माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांनी बीड शहरातील रस्ते, बायपास प्रकल्प, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सुभाष सुतार यांच्या ३० वर्षांच्या सेवेला मतदारांची साथ

## गेवराईत प्रभाग क्रमांक आठमध्ये कु.सोनाली सुतार यांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ मध्ये प्रचाराचा जोर चांगलाच वाढला असून, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांच्या ३० वर्षांच्या अखंड सेवाभावाला मतदारांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला आहे. भाजपकडून या प्रभागातून




उमेदवारी मिळालेल्या त्यांच्या कन्या कु. सोनाली सुभाष सुतार यांच्या नावाला चांगला पाठिंबा मिळत असून, मतदारांनी त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून, प्रभाग क्रमांक आठ मधील भाजपाच्या अधिकृत उमेदवार सोनाली सुभाष सुतार आणि शहदाद भाईंचा विजय निश्चित ▶▶ उर्वरित पान २ वर

# पवारांनी सुरु केलेल्या महाभारतात माझे सारथ्य अमरसिंह पंडित करत आहेत : महेश अण्णा दाभाडे

## राजेंचा विकास–यज्ञ सुरू ठेवण्यासाठी घड्याळाला मतदान करा

**गेवराई । प्रतिनिधी**

मी मागील २५ वर्षांपासून समाजकारण व राजकारणात आहे. मी लोकांमधील माणुस असुन लोक हेच माझा श्वास आहेत. मी मा.आ. अमरसिंह पंडित व बाळराजे पवार दोन्ही सोबत काम केलेले आहे. मी ज्यासोबत राहीलो त्यासोबत तन–मनाने काम केले आहे. ज्या पवारांना निवडून आणण्यासाठी जीवाची पर्वा न करता लोकांना अंगावर घेतले त्याच पवारांनी माझ्या घरामध्ये महाभारत सुरू केले आहे. परंतु पवारांनी एक लक्षात ठेवावे कि, या महाभारतात माझे



सारथ्य मा.आ. अमरसिंह पंडित हे करत आहेत. असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे यांनी केले. ते गेवराई नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्षा व नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये बोलत होते. गेवराई नगरपरिषद निवडणुकीमध्ये मा.आ. अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्षा व नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. मागील ११ महिन्यातील विकास कामामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांचा विजय निश्चित झाला आहे. अमरसिंह पंडित यांचे नियोजन व विजयसिंह पंडित यांचा कृती कार्यक्रम यापुढे विरोधकांचा धुव्वा उडाल्याचे दिसून येते. अशावेळी पवारांनी पाटील की, नाते गोते व धाक दडपशाही चा वापर सुरू केल्याचे दिसून येते. यासंदर्भात बोलताना माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे म्हणाले की, पवारांना लोकांना ग्रहीत धरण्याचा रोग झाला आहे. ते म्हणतात आम्ही दगड जरी उभा केला तरी निवडून येतो. आम्हाला लोकांची गरज नाही तर लोकांना आमची ▶▶ उर्वरित पान २ वर

# नवनाथ शिराळे पाटील यांनी बीड शहर पिंजून काढून घराघरांमध्ये भारतीय जनता पार्टीचे भगवे वातावरण निर्माण केले

## सर्व मतदार बंधू आणि भगिनींमध्ये उत्सुकत प्रतिसाद भारतीय जनता पार्टीचाच नगराध्यक्ष होणार असे सर्व नागरिकांमधून ग्रीन सिग्नल

**बीड । प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये महानगरपालिका नगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे स्वतः महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री नामदार देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा यांनी देखील प्रचारासाठी स्वतः बाहेर पडून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन भारतीय जनता पार्टीचे कार्य कशा पद्धतीने आहे लोकांच्या विकासासाठी माननीय



मोदी साहेब कशाप्रकारे प्रयत्न करत हे महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांमध्ये जिल्ह्यामध्ये व गावागावांमध्ये कार्य पोहोचण्यासाठी ते महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महाप्रचार

**सर्व बीड शहरातील तमाम मतदारांना भारतीय जनता पार्टीने दिलेल्या सर्व नगरसेवकांना निवडून द्यावे व नगर अध्यक्ष पदाच्या दिलेल्या उमेदवारांना निवडून द्यावे असे आव्हान केले नागरिकांमधून देखील उत्सुकत प्रतिसाद मिळाल्यामुळे आता भारतीय जनता पार्टीचा झेंडा बीड नगर परिषदेवर फडकण्यासाठी सर्व बीड शहरातील तमाम मतदार बंधू आणि भगिनी सज्ज झाले असून तमा मतदार बंधू आणि भगिनींनी दिले भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना व नगर अध्यक्ष पदाच्या उमेदवाराला निवडून देण्याचे ग्रीन सिग्नल**

सभा या नगर परिषदेच्या व महानगर पंचायतीच्या निवडणुकीदरम्यान घेत आहेत याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या नगर परिषदेवर कोणत्या पक्षाचा झेंडा फडकणार ही उत्सुकता महाराष्ट्राला लागली तसेच बीड▶▶ उर्वरित पान २ वर